Page :
Date : / /

# शिक्षक - पालक संघाची माहिती

Page :
Date : / /

# *शिक्षक - पालक संघ*

## प्रस्तावना -:

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या भौतिक, शैक्षणिक व विद्यार्थी विकासाच्या संदर्भातील समस्या सोडविण्यासाठी व शालेय कामकाजांमध्ये पालकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी, दिनांक - 18 मे 1996 च्या शासन निर्णयान्वे प्रत्येक मान्यताप्राप्त शाळेत पालक - शिक्षक संघाची स्थापना करणे अनिवार्य करण्यात आले होते. त्या अनुषंगाने माध्यमिक शाळा संहितेतील नियम क्रमांक 3.2 मध्ये ही तरतूद करण्यात आलेली आहे.

त्यानंतर, माननीय उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील प्रत्येक खासगी, विना, अनु- दानित शाळेतही शिक्षक - पालक संघाची स्थापना अनिवार्य करण्यात आलेली आहे. या संदर्भात निर्णय देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या वतीने दिनांक 24 ऑगस्ट, 2016 रोजी शासन निर्णय त्वरीत करण्यात आला.

Page:
Date: / /

# • शिक्षक - पालक संघाची उद्दिष्ट्ये - •

1] गावातील पालक व शाळा यामध्ये सुसंवाद.

2] शाळेसंबधीच्या महत्वाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे.

3] शासनाच्या विविध योजनांची माहिती.

4] पालक शाळा मदतीने चांगले कुटुंब निर्माण करणे.

5] मुलामुलींच्या प्रगतीला चालना देणे.

6] गावातील पालक वर्गास शाळेशी संपर्क साधण्याची संधी देणे.

7] विदयार्थ्यांना विविध उपक्रमासाठी प्रोत्साहीत करणे.

8] शाळेची विकास कामे करणे.

Page :
Date : / /

# • पालक - शिक्षक संघाची गरज •

आपल्याला जर मुलांचा सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर, सामाजिक प्रदुषण टाळुन देणारे विदयार्थी घडवायचे असतील तर त्यासाठी शिक्षणामध्ये पालक सहभागाची आवश्यकता असते तरच स्पर्धेच्या युगात विदयार्थी टिकुन राहतील विदयार्थ्यांच्या प्रत्येक कार्यात पालकांचा सहभाग असणे विशेषत: आवश्यक असतो. तरच त्यांची प्रगती होईल. तसेच त्यांना पालकांच्याही मार्गदर्शनाची गरज असते.

1] विदयार्थ्यांच्या सवयी जाणुन घेण्यासाठी.

2] पालकांच्या अडचणी जाणुन घेण्यासाठी.

3] शालेय उपक्रमाची परिणामकारकता वाढविणे.

4] शाळेच्या अडचणी सोडविण्यासाठी.

5] विदयार्थ्यांना अवांतर माहिती देण्यासाठी.

Page :
Date : / /

# • पालक - शिक्षक संघाचे महत्व •

शिक्षणामध्ये पालकांनी सहभाग घेतल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर कोणते परिणाम होतात. या संबधीची माहिती आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येते.

1] मुलांची दैनंदिन उपस्थिती

2] मुलांचा बोधात्मक विकास

3] मुलांचा दृष्टीकोन

4] सामाजिक कौशल्याचा विकास

5] मुलांचा आत्मविश्वास

6] प्रेरणा व प्रवर्तन

7] मुलांचा शारीरीक विकास

8] मुलांचा बौद्धीक विकास

Page:
Date: / /

# • पालक - शिक्षक संघाच्या कार्यकारीणी समितीची रचना •

| | | |
|---|---|---|
| 1] | अध्यक्ष मुख्याध्यापक | प्राचार्य |
| 2] | उपाध्यक्ष | पालकांमधुन एक |
| 3] | सचिव | शिक्षकांमधुन एक |
| 4] | सहसचिव (2)<br>शिक्षकांमधुन (1) | पालकांमधुन एक |
| 5] | सदस्य | प्रत्येक इयत्तेतील एक शिक्षक प्रत्येक तुकडीसाठी एक पालक<br>(जेवढ्या तुकड्या तेवढे पालक) |

Page:
Date: / /

# • पालक - शिक्षक संघाची रचना व कार्यपद्धती •

1] राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानीत, विना-अनुदानीत व कायम वीनाअनुदानीत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून 30 दिवसांच्या आत पालक-शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली.

2] शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचे पालक हे शिक्षक-पालक संघाचे सभासद असतील.

3] शहरी भागात रुपये ५% व ग्रामीण भागात रुपये १% या दराने पालक-शिक्षक संघाच्या प्रत्येक सभासदाकडुन दरवर्षी सभासद शुल्क आकारण्यात येईल.

4] पालक - शिक्षक संघाची स्थापना झाल्यानंतर पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीची निवड लोकशाही पद्धतीने दोन आठवड्यात करण्यात येईल. त्यासाठी दयावयाच्या बैठकिची सुचना सर्व संबाधितांना मुख्याध्यापकांकडुन पत्राद्वारे एक आठवडा अगोदर देण्यात येईल.

5] सर्व बैठकांची सुचना पत्राद्वारे विषय पत्रिकेसह सर्व सभासदांना आगाऊ पाठविण्यात येईल.

Page:
Date: / /

6] सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांकडुन पालक-शिक्षक संघाची स्थापना केल्यानंतर 15 दिवसांच्या आत सभासदांच्या नावाची यादी व कार्यकारीणी समितीच्या सदस्यांची यादी संबधीत शिक्षणाधिकारी शिक्षण निरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात येईल.

7] पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारी संघटनांची मुदत एक वर्ष राहील कोणत्याही पालकास एकदा पदाधिकारी अथवा कार्यकारी समितीचा सदस्य झाल्यानंतर त्या नंतरच्या पाच वर्षात पदाधिकारी अथवा कार्यकारी समितीचा सदस्य होता येणार नाही.

8] कार्यकारी समितीची बैठक महिन्यातुन एकदा घेण्यात येईल.

9] बैठकिचे स्वाक्षरीत इतिवृत्त नोंदवहीत ठेवुन ती नोंदवही जतन करुन ठेवण्यात येईल.

Page :
Date : / /

# • पालक - शिक्षक संघाची कर्तव्य किंवा कार्य •

1] नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण होईल हे पाहणे.

2] अभ्यासक्रमात कुमकुवत असलेल्या विदयार्थ्यांसाठी योग्य त्या उपाययोजना सुचवणे.

3] अभ्यासक्रमाशी पूरक असलेल्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यासाठी शाळांना साह्य करणे.

4] सहशालेय उपक्रमांना मान्यता देणे.

5] शाळेतील शैक्षणिक शुल्क, सत्र फी, व सहशालेय उपक्रमांसाठी आकारण्यात येणारे शुल्क संबधीची माहिती घेऊन पालक शिक्षक संघाच्या कार्य - कारीणीसमितीपुढे त्यांचे म्हणने मांडणे.

6] पालक - शिक्षक संघाचे मुख्य कर्तव्य म्हणजे विदयार्थी व शिक्षकांच्या समस्या सोडविणे हा आहे. त्यांनी शाळेच्या दैनंदीन कामकाज व प्रशासनास लक्ष घालणे आवश्यक आहे.

7] पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारिणी समितीच्या सदस्यांच्या नावाची यादी शाळेच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

# •पालक - शिक्षक सभेची मार्गदर्शक तत्वे•

1] शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक-पालक संघाचे सभासद असतील.

2] पालक शिक्षक संघाने शाळेच्या दैनंदीन कामकाजात व प्रशासनात लक्ष घालणे अपेक्षित नाही.

3] पालक - शिक्षक संघाचा मुळ उद्देश विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या सोडविणे हा आहे.

4] पालक - शिक्षक सभेची स्थापना प्रत्येक शाळेत करणे अनिवार्य आहे.

5] शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन तीन दिवसांच्या आत पालक शिक्षक सभेची स्थापना करणे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेला बंधनकारक असेल.

6] पालक संघाची स्थापना झाल्यानंतर पालक शिक्षक संघाचे कार्यकारी समितीची निवड शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पालक शिक्षक संघाच्य सर्वसाधारण सभेत केली जाणार असून त्या.

Page :
Date : / /

# •पालक-शिक्षक संघटनेसाठी विविध उपक्रम•

शाळा हे असे ठिकाण आहे की येथे अनेक जाती, धर्म, प्रांत, भाषा व राज्याची मुळ एकत्र येत असतात. शाळा ही समाजाची छोटीशी प्रतिकृतीच असते या छोट्याश्या समाजाच्या विकासासाठी पालक - शिक्षक संघटना खालील कार्यक्रम राबवितात.

## १) बौध्दीक विकासासाठी -:

वादविवाद स्पर्धा, चर्चासत्रे, मासिके

## २) भावनिक विकासासाठी -:

पुण्यतिथी साजरी करणे, सण, उत्सव साजरे करणे, वृक्षारोपण करणे.

## ३) शारीरिक विकासासाठी -:

भाषा कौशल्य, हस्त कौशल्य, विकासीत करण्यासाठी पालक - शिक्षक उपक्रम राबविणे, त्याचबरोबर कथाकथन तसेच कविता, पाठांतरइ

Page :
Date : / /

# • पालक मार्गदर्शन कार्यक्रम •

1] पालकांचा परिचय सोहळा.

2] शाळा व शिक्षक परिचय.

3] अभ्यासक्रम परिचय.

4] परिक्षा पद्धतींचा परिचय.

5] अभ्यासपुरक अभ्यासक्रमांची ओळख.

6] मुलांचे आरोग्य व आहार

7] मुलांची संगत व त्यांच्या सवयी

8] गृहपाठ

9] पालक सभांचे आयोजन

10] विविध कार्यक्रमात पालकांचा सहभाग.